दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरूवार दि.९ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 9 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 52 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## केंद्र सरकार कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी

**मुंबई**–नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार देखील कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी राहिले आहे. शेतकरी सन्मान निधीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात निधी दिला जात आहे. शेतकऱ्यांना काय दिले? असा प्रश्न विरोधी पक्षातील काही नेते उपस्थित करतात. मात्र त्यांना ही आकडेवारीच माहीत नसल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. मात्र आपल्या शेतकऱ्यांना आणि बळीराजाला या सर्वांची पूर्ण जाणीव आहे. काँग्रेस सरकारच्या काळामध्ये महाराष्ट्राला दिलेल्या निधीच्या तुलनेत पाच पट जास्त मदत नरेंद्र मोदी सरकारने महाराष्ट्राला दिली असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. ही मदत कायमस्वरूप राहील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

# पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना दिलासा: परीक्षा शुल्क होणार माफ, राज्य शासनाचा महत्त्वाचा निर्णय

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. या पुराच्या पाण्यात अनेकांचे घरं अक्षरशः वाहून गेली आहेत. तर अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. शेतकऱ्यांचे तर नुकसान झालेच, परंतु विद्यार्थ्यांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य पाण्यात वाहून गेलेल्या विद्यार्थ्यांना चांगलाच फटका बसला आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सोबतच शैक्षणिक संस्थांनीही सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, अनेक विद्यार्थ्यांचे साहित्य आणि शैक्षणिक साधने पुरामुळे नष्ट झाली आहेत. त्यामुळे महाविद्यालये, विद्यापीठे आणि खाजगी शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश अशा स्वरूपात सामाजिक कर्तव्य म्हणून मदत करावी. यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल आणि त्यांचे शिक्षण अखंडितपणे सुरू राहील, असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.मंत्रालयात राज्यातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा आढावा घेण्यासाठी चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत चंद्रकांत पाटील यांनी याबाबतचा निर्णय घेतला आहे. या बैठकीला उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उपसचिव प्रताप लुबाळ, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अजय भामरे, तसेच राज्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.दरम्यान, मागच्या महिन्यात बारावी बोर्ड परीक्षेचा फोरम भरण्याचा शेवटचा दिवस हा ३० सप्टेंबर होता. अंतिम तारीख पुढे ढकलण्याचे निर्देश देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार मंत्री दादा भुसे यांनी याबाबतचा निर्णय जाहीर केला होता. पुराचा फटका हा विद्यार्थ्यांना चांगलाच बसला असून विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये म्हणून सरकारकडून सर्वतोपरी मदत केली जात असल्याचे दिसून येत आहे.



## निगमानंद विद्यालयाच्या कार्तिक परमेश्वर हंडाळची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील श्री निगमानंद विद्यालय तळणेवाडी या शाळेचा विद्यार्थी कार्तिक परमेश्वर हंडाळ याने १४ वर्षे वयोगटातील कुस्ती स्पर्धेमध्ये विभागीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला असून त्याची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल कार्तिकवर जिल्ह्यातील खेळाडू आणि क्रीडा प्रेमींकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये गेवराई तालुक्यातील तळणेवाडी येथील श्री निगमानंद विद्यालयात इयत्ता आठवी मध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी कार्तिक परमेश्वर हंडाळ याने १४ वर्षे वयोगटातील कुस्तीमध्ये ४१ किलो वजन गटात प्रतिस्पर्ध्याला चारीमुंड्या चित



करून प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी कार्तिक हंडाळ याची आता निवड झाली आहे. त्याच्या निवडीमुळे गेवराई तालुक्याचे पुन्हा एकदा नाव कुस्तीच्या मैदानावर राज्यभरात झळकणार आहे. कार्तिकच्या या यशाबद्दल युवा नेते यशराज पंडित, त्याचे वडील परमेश्वर हंडाळ , आजोबा तसेच क्रिडा शिक्षक शिवनाथ कचरु काळे, संस्थेचे अध्यक्ष श्री.ह.भ. प.स्वामी जनार्दन महाराज गुरु निगमानंदजी महाराज ,सचिव कचरु मारुती काळे व मुख्याध्यापक अशोक भिल्लारे सर,सरपंच अविनाश धस, उपसरपंच लहुजी शिंदे, तसेच शालिय व्यवस्थापन समितीचे उप अध्यक्ष धुराजी धस,पत्रकार तुकाराम धस,फुलचंद काका बोरकर ,विक्रम भोसले, भगवान भाऊ बोरकर, सुंदरराव धस,शाळेतील शिक्षक गोविंद शेळके सर,रमेश शिर्के सर, शेषराव मोरे सर,निलेश माळीच सर,विठ्ठल हाके सर,श्रीकांत राजहंस सर,विष्णुआबा धस,शिवराम धस, तळणेवाडी येथील ग्रामस्थांसह बीड जिल्ह्यातील खेळाडू आणि क्रीडा प्रेमींनी त्याच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला आहे.

## तिखोरा-उंटावद रस्त्याची झाली चाळण! अवजड वाहनांमुळे खड्डा की रस्ता ओळखू नये अशी अवस्था

**दैनिक वादळ वार्ता**
**बोरद । मंगेश पाटील**

शहादा तालुक्यातील तिखोरा ते उंटावद या गावांना जोडणारा रस्ता अक्षरशः खड्डा की रस्ता ओळखू नये अशा अवस्थेत पोहोचला आहे. काही महिन्यांपूर्वी शासनाने मोठ्या खर्चाने तयार केलेला हा मार्ग अवजड वाहनांच्या अतिवापरामुळे अत्यंत खराब झाला असून, दररोज लहानमोठे अपघात घडत आहेत.



शहादा-प्रकाशा मुख्य मार्गावरील डामरखेडा पुलाचे बांधकाम सुरू असल्यामुळे, जिल्हा प्रशासनाने सर्व अवजड वाहतूक शहादा मार्गे वळवण्याचा निर्णय घेतला. परिणामी मध्यप्रदेश व गुजरात राज्यांमधून येणारी ट्रक आणि कंटेनर वाहतूक तिखोरा मार्गे सुरू झाली. या अवजड वाहनांमुळे नुकताच बनलेला डांबरी रस्ता काहीच महिन्यांत उखडून गेला आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या मते, रस्त्याची अवस्था एवढी बिकट झाली आहे की, खड्डा टाळताना वाहनं उलट्या दिशेने येतात, त्यामुळे अपघातांची संख्या झपाट्याने वाढली आहे. ग्रामस्थांनी अनेकदा प्रशासनाचे लक्ष वेधले असले, तरी अद्याप दुरुस्तीचे कोणतेही काम सुरू झालेले नाही.वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी तिखोरा गावाजवळ पोलिस पथक तैनात करण्यात आले असले, तरीही अवजड वाहनांची वर्दळ कमी झालेली नाही. परिणामी रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच दयनीय होत आहे.ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासनाकडे तातडीने दुरुस्ती करून अवजड वाहनांवरील बंदी कायम ठेवण्याची मागणी केली आहे.

## वंचित बहुजन आघाडीचा विराट जन आक्रोश मोर्चा धारूर तालुक्यात संपन्न

### शेतकऱ्यांच्या, वंचित समाजाच्या आणि सामान्य जनतेच्या हक्कासाठी बुलंद आवाज

**दैनिक वादळ वार्ता**
**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज प्रचंड उत्साहात विराट जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील शेतकरी, युवक, महिला आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाविरोधात घोषणाबाजी करत आपल्या मागण्यांचे निवेदन तहसील कार्यालयात सादर केला. या मोर्चाचे नेतृत्व तालुकाध्यक्ष इंजी. प्रशांत उघडे यांनी केले. मोर्चास वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, महासचिव मिलिंद घाडगे, युवक जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के, धम्मानंद साळवे , अंकुश जाधव, माजलगाव तालुकाध्यक्ष अशोक पोळ, समाधान




गायकवाड,वडवणी युवक तालुकाध्यक्ष विनोद काकडे, युवा नेते प्रकाश उजगरे, बाळासाहेब उजगरे, कपिल उजगरे, राबवा उजगरे, शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे, अभिजीत वाव्हळ, धम्मा कासारे तसेच धारूर तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. राज्यात अतिवृष्टी जाहीर करावी.शेतकऱ्यांना हेक्टरी ५०,००० अनुदान देण्यात यावे.सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी. गायरान धारकांना सातबारा मिळावा.अनुसूचित जमातींची प्रलंबित जात प्रमाणपत्रे तात्काळ जारी करावीत. रमाई आणि पंतप्रधान गृहनिर्माण योजनेतील प्रलंबित लाभार्थ्यांना तात्काळ हप्ते द्यावेत.संजय गांधी,श्रावणबाळ, निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे पगार वेळेवर द्यावेत. अतिवृष्टीमुळे संपर्क तुटलेल्या गावांचे पूल तात्काळ बांधावेत. या मागण्या प्रमुख होत्या. मोर्चात सहभागी झालेल्या शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर तसेच पक्ष कार्यकर्त्यांनी घोषणांनी वातावरण दणाणून सोडले.मोर्चाचे निवेदन तहसीलदारांना देऊन शासनाने या मागण्या तातडीने मान्य कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. तालुक्यातील वंचित समाजाच्या न्याय आणि हक्कांसाठीचा हा मोर्चा परिणामकारक ठरेल असे कार्यकर्त्यांनी विश्वास व्यक्त केला.

## सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भुषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ संविधान प्रेमींकडून आज परळीत निदर्शने

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर बूट फेक करणाऱ्या देशद्रोही वकील राकेश किशोर या वकिलावर गुन्हा दाखल करावा व या घटनेच्या निषेधार्थ परळी शहरात आज संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत.



भारतीय संविधान आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी या देशातील न्याय व्यवस्था सर्वात महत्वाचा घटक आहे.देशात कायद्याची अंमलबजावणी होते किंवा नाही,शासन - प्रशासन भारतीय संविधानानुसार काम करत आहे की नाही यावर लक्ष ठेवण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करीत असते.धर्मानिरपेक्षक्ष संविधान हे लोकशाहीचा आत्मा आहे.आणि देशातील या सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर एका सनातनी देशद्रोही वकिलाने बुट फेकून हल्ला केला आहे. हा हल्ला या देशाच्या न्यायव्यवस्थेवर आणि लोकशाहीवर झालेला आहे. ही घटना अत्यंत गंभीर आणि देशद्रोहाचा गुन्ह्यासारखीच आहे.

या हल्लेखोर राकेश किशोर वकिला वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व त्याला केंद्र सरकारने अटक करावी या मागणीसाठी आज दिनांक ९ ऑक्टोबर रोजी राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक येथे सकाळी ११ वाजता तमाम संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत. या निदर्शनात शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिवसेना उबाठा पक्षाचे राज्यव्यापी आंदोलन केज येथे संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व शिवसेना नेते अंबादास दानवे,उपनेत्या सुषमाताई अंधारे,संपर्कप्रमुख परशुराम जाधव,सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे,जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या आदेशावरून तहसील कार्यालय केज येथे तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्यानेतृत्वाखाली केज तालुक्यातील शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमुक्ती,शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५०००० हजार रूपये अनुदान द्यावे पिकविम्याचे बोगस निकष बंद करणे,पडझड झालेली घरे व मृत पावलेल्या पशुधनासाठी भरघोस मदत मिळावी यासह विविध माग्यासाठी घरणे आंदोलन,निदर्शने करण्यात आले.या वेळी उपस्थित शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तालुक्यातील संतप्त शेतकऱ्यांचा बैलगाडी मोर्चा ;तहसील कार्यालया समोर बैलगाडीला पेट्रोल टाकून लावली आग

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

कोरडेवाडी ता.केज येथे धर्मवीर संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्रीताई राठोड या गेल्या सहा दिवसांपासून उपोषणाला बसल्या आहेत.त्यांच्या उपोषणाकडे आणि मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने संतप्त गावकऱ्यांनी आज मोठ्या संख्येने बैलगाडी मोर्चा काढून केज तहसील कार्यालयावर धडक दिली.

यामोर्चाचे नेतृत्व बाळराजे आवारे पाटील यांनी केले. तहसील कार्यालयाच्या आवारात आंदोलकांनी रोष व्यक्त करत बैलगाडी वर पेट्रोल टाकून ती पेटवून



दिली.यामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

आंदोलकांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.कोरडेवाडी येथील साठवण तलाव मंजूर करावा.ज्ञानराधा बँकेच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत देण्यात याव्यात. राज्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून प्रति हेक्टरी ५०,००० नुकसान भरपाई देण्यात यावी.या मागण्यांबाबत प्रशासनाकडून अद्याप ठोस भूमिका घेतली नसल्याने शेतकरी वर्गा मध्ये संतापाची लाट आहे. राजश्रीताई राठोड यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस असून त्यांच्या आरोग्याचीही स्थिती चिंताजनक होत चालली आहे.आंदोलकांनी चेतावणी दिली की, मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

संपादकीय

# निवडणुकीच्या तोंडावर,नेते बोलू लागले विकासावर

जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका तोंडावर आल्या आल्या दक्षिण महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांची भाषा विकासाची झाली आहे. कोल्हापुरात सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी सांगली, कोल्हापूर, साताऱ्याच्या विकासाचा विडा उचलत इथल्या व्यापाऱ्यांची, उद्योजकांची परिषद घेतली, तर सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उद्योगमंत्र्यांना हाताशी धरत सांगलीच्या विमानतळाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रत्येक मंगळवारी बैठक घेण्याचा आणि कार्गो विमानतळ लवकरच सुरू करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. नेत्यांना एकदमच विकासाची हुक्की आली आहे. एखादा मुद्दा तापवायचा म्हटला की त्याला कसे वारे घालायचे आणि कशी धग निर्माण करायची हे शिकायचे असेल तर दक्षिण महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाकडून शिकावे. पूर्वीच्या काळी कोणत्याही निवडणुका आल्या की गावोगाव फक्त पांढऱ्या फक्कीच्या रेघा ओढलेल्या लोकांना दिसायच्या. नाही तर काही मंडळी रस्त्यावर मोजपट्टीने मापे घेत फिरत असलेली दिसायची. लोकांनी काय सुरू आहे असे उत्सुकतेपोटी विचारले, की एखाद्या मोठ्या प्रकल्पाचे किंवा रस्ता रुंदीकरणाचे नाव सांगून तेवढेच वातावरण केले जायचे. नंतर पुन्हा पाच वर्षे त्या आश्वासनाच्या पलीकडे काही व्हायचे नाही. नेत्यांची ही सवय आजही गेलेली नाही असे खेदाने म्हणावे लागते. दक्षिण महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर आणि सांगली हे तीन जिल्हे नेहमीच राजकीय भूकंपाचे केंद्र राहिले आहे. गेल्या आठ दिवसांत येथे अतिवृष्टीच्या संकटाने शेतकऱ्यांना तडफडावे लागले, तर राजकीय नेत्यांनी मात्र या आपत्तीला सत्तेच्या खेळात रूपांतरित करण्याचा डाव रचला. भाजपची 'इशारा सभा' ते राष्ट्रवादीची रोख मदत, काँग्रेसची उपोषणे ते शिवसेनेची कर्जमाफीची मागणी–प्रत्येक घडामोडीत फक्त एकच सत्य दिसते : नेते शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रूंचेही राजकारण करतात. सांगली जिल्ह्यातील अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त झाले. पिकांचे मोठे नुकसान, रस्ते खराब, घरांची पडझड झाली. पण, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मात्र १ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन फक्त कागदावरचे 'निर्देश' दिले. 'आठवडाभरात पंचनामे पूर्ण करा, दिवाळीपूर्वी भरपाई जमा होईल,' असा ढोल पिटला. पण प्रत्यक्षात? शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही आलेला नाही. हे नेते फक्त फोटो सेशन करतात. शेतकऱ्यांच्या शेतात पाय ठेवण्याची हिंमत नाही. ३० सप्टेंबरला मंत्रालयात झालेल्या विमानतळ विकास बैठकीतही पाटील यांनी कवलापूर कार्गो विमानतळाच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले. सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ, माजी मंत्री सुरेश खाडे, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार सुहासबाबत यांच्यासोबत अपक्ष खासदार विशाल पाटील आणि काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम यांनीही या बैठकीत सहभाग घेतला. शेतकरी जेव्हा वेगळ्या संकटात आहेत तेव्हा त्यावर काही करण्यापेक्षा विमानतळ विषयावर बैठक लावणे म्हणजे नेते फक्त हवाई बोलत आहेत. दुसऱ्याच दिवशी १ ऑक्टोबरला सांगलीत भाजपने आयोजित केलेली 'इशारा सभा' ही तर राजकीय नाटकाची पराकाष्ठा होती. चंद्रकांत पाटील, सुरेश खाडे, सत्यजीत देशमुख, सदाभाऊ खोत आणि मुख्य म्हणजे गोपीचंद पडळकर यांसारख्या नेत्यांनी 'महाराष्ट्राची राजकीय संस्कृती बिघडवणाऱ्यांना इशारा' दिला. सभेनंतर रावण दहन म्हणजे विरोधकांना विशेषकरून जयंत पाटील यांना 'रावण' म्हणून कॅरेक्टर असॅसिनेशन? ही सभा अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर झाली, पण शेतकऱ्यांच्या नुकसानीवर एक शब्द नाही. २ ऑक्टोबरला राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी १३ ऑक्टोबरला सदस्य आरक्षण सोडत जाहीर केली. दहा नगरपालिकांच्या नगराध्यक्षपदासाठी कालच आरक्षण सोडत झाली. हे सर्व उमेदवारांच्या राजकीय बाजारात उत्साह आणेल, पण जनतेला फायदा काय? अतिवृष्टीग्रस्त भागात पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी ३ ऑक्टोबरला 'त्वरित पंचनामे' करण्याचे निर्देश दिले, पण प्रत्यक्षात प्रशासन अजूनही झोपेत आहे. शिवसेना (उबाठा)ने ३० सप्टेंबरला सरसकट कर्जमाफीची मागणी करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. हे नेते शेतकऱ्यांच्या नावाने राजकारण करतात, पण कर्जमाफीसाठी एकही ठोस आंदोलन नाही. केवळ निवेदनाची औपचारिकता. कोल्हापूरमध्ये काँग्रेसने २७ सप्टेंबरला महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी आढावा बैठक घेतली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, सतेज पाटील, जयंत आसगावकर यांनी रणनीती आखली. २८ सप्टेंबरला सतेज पाटील यांनी 'कोल्हापूर–सांगली–सातारा डेव्हलपमेंट कॉरिडॉर'ची संकल्पना मांडली. उद्योग, पर्यटन, तंत्रज्ञानावर चर्चा झाली, पण अतिवृष्टीच्या संकटात ही 'डेव्हलपमेंट' कशी शक्य आहे? आणि अचानकच का? वरिष्ठ पत्रकार, उद्योगपती यांसारख्या मान्यवरांनी भाग घेतला, पण हे कॉरिडॉर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल का? अचानक निवडणुकीच्या हंगामात हा मुद्दा का आणला आहे याबद्दल कोणीही काही बोलले नाही. सत्याला समोरे जाण्याची कोणाचीही तयारी नाही हेच यातून दिसले. केवळ लोकानुनय आणि नेत्यांच्या भुलवण्याच्या कृतीला मूक संमती देण्याचे काम या मंडळींनी केले. त्यांनी हा मुद्दा आता काढला? असा किमान प्रश्न केला असता तरी आयोजकांना आपली भूमिका स्पष्ट करावी लागली असती. विकास आपल्या गतीने सुरूच असतो. मात्र जेव्हा मदतीची गरज आहे तेव्हा 'विमानतळ आणतो' आणि 'नवा कॅरिडॉर बांधतो' अशा घोषणांनी प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे नुकसान भरून येणार नाही. भाजपची 'इशारा सभा' ही फक्त विरोधकांना धमकी देण्याचे साधन आहे, राष्ट्रवादीची साताऱ्यात केलेली रोख मदत हा प्रचाराचा डाव आहे, तर काँग्रेसची बैठक फक्त कागदावरची रणनीती आहे. हे स्टंट आता पुरे! शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसा, नाहीतर २०२५च्या निवडणुकीत जनता तुम्हाला 'इशारा' देईल तोही कायमचा!

# तळोदा न.प.निवडणूक २०२५ प्रभाग आरक्षण सोडत जाहीर!

## ११ महिला नगरसेविकांसह एकूण २१ जागांवर लढत निश्चित

**नंदुरबार | दिपक गोसावी.**

तळोदा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची प्रभाग निहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज पार पडला . एकूण १० प्रभागांवर २१ नगरसेवक असणार आहेत . त्यापैकी ११ महिला नगरसेविका असणार आहेत. यावेळी एक प्रभाग व तीन नगरसेवक वाढले आहेत. वाढ झालेल्या नगरसेवकांच्या सर्वसाधारणच्या २तर इतर मागास प्रवर्गाची १ जागा वाढली.

सकाळी ११ वाजता केंद्रीय प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सोडतीसाठी ५ वर्षाच्या वैष्णवी पाडवीच्या हातून सोडतीच्या चिठ्ठ्या काढण्यात आल्यात . यावेळी कार्यक्रमाच्या नियंत्रक अधिकारी म्हणून सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर हे होते तर सहाय्यक अधिकारी म्हणून पालिकेचे मुख्याधिकारी विक्रम जगदाळे यांनी काम पाहिले . पालिकेचे अधिक्षक कमलेश काळे, मुख्य लिपिक राजेंद्र माळी, बांधकाम अभियंता रितेश बच्छाव, आश्विन परदेशी, डीगंबर माळी, नारायण चौधरी, मोहन सूर्यवंशी, सनी ठाकरे, सचिन कोळेकर आदी कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी




मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन २०१७ यावर्षी पालिकेच्या एकूण नगरसेवकांची संख्या होती . मागील पाच वर्षात प्रभागातील मतदारांची संख्या वाढल्याने शासनाच्या नियमाप्रमाणे एक प्रभाग वाढला असून एकूण नगरसेवकांची संख्या २१ असणार आहे. त्यापैकी ११ जागेवर महिला नगरसेविका निवडणूक लढवतील त्यापैकी अनुसूचित जमाती च्या एकूण ६ जागांवर पन्नास टक्के महिला आरक्षणानुसार ३ जागा या अनुसूचित जमाती महिलांना गेल्या. १ जागा अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव तर सर्वसाधारण मागासवर्गासाठी ३ महिला राखीव व खुल्या प्रवर्गासाठी ४ जागेवर महिलांचे आरक्षण राहील तर अनुसूचित जमातीसाठी एकूण ६ जागा, अनुसूचित जातीसाठी १ जागा, सर्वसाधारण मागासवर्ग करिता एकूण ६ जागा तर खुला प्रवर्गासाठी एकूण ८ जागा आरक्षित झाल्या आहेत. आरक्षण सोडतीत २१ जागांवर निघालेले आरक्षण पुढील प्रमाणे प्रभाग क्र.१– अनुसूचित जमाती (एस .टी) पुरुष व सर्वसाधारण महिला प्रभाग क्रमांक – २ – अनुसूचित जमाती ( एस टी ) महिला, व इतर मागासवर्ग– महिला , सर्वसाधारण पुरुष – प्रभाग क्रमांक ३– अनुसूचित जाती ( एस . सी ) महिला, सर्वसाधारण पुरुष , प्रभाग क्रमांक ४– अनुसूचित जमाती (एस टी )महिला व सर्वसाधारण पुरुष , प्रभाग क्रमांक ५ – इतर मागास प्रवर्ग पुरुष व सर्वसाधारण महिला , प्रभाग क्रमांक ६ – अनुसूचित जमाती (एस टी ) पुरुष व सर्वसाधारण महिला , प्रभाग क्रमांक – ७ इतर मागास प्रवर्ग पुरुष, सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ८ – अनुसूचित जमाती ( एस टी)महिला व इतर मागास प्रवर्ग पुरुष, प्रभाग क्रमांक – ९ इतर मागास प्रवर्ग महिला व जनरल पुरुष आणि प्रभाग क्रमांक १०– अनुसूचित जमाती (एस टी )पुरुष व इतर मागास प्रवर्ग महिला याप्रमाणे आरक्षण निघाले आहे . २१ जागांपैकी १२ महिला त्यापैकी अनुसूचित जमाती( एस टी ) ३, अनुसूचित जाती (एससी) १ , इतर मागासवर्ग (ओबीसी) ३ तर सर्वसाधारण (खुला ) ४ तर १० जागांवर पुरुष आरक्षण असणार आहे. त्यात अनुसूचित जमाती ३, इतर मागास प्रवर्ग ३, व ४ सर्वसाधारण अश्या एकूण १० जागांवर पुरुष नगरसेवक निवडून येणार आहेत.

# व्यंकटेश गणेश मंडळ आयोजित दांडिया स्पर्धेचे बक्षीस वितरण

## नारी अबला नाही, तर सबलाच–डॉ.राजेश इंगोले

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई | प्रतिनिधी**


व्यंकटेश गणेश मंडळ आयोजित दांडिया स्पर्धेचे बक्षीस वितरण नुकतेच मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, नारी ही अबला नसून सबलाच आहे. परंपरावादी व्यवस्थेने दुर्दैवाने महिलांना दुय्यम दर्जा दिला आणि कधी काळी मातृसत्ताक कुटुंब पद्धती असलेल्या भारतामध्ये स्त्रियांना गुलाम म्हणून जगावे लागले. स्त्रियांकडे फक्त चूल आणि मूल याच्या उपयोगितेच्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले आणि हे चित्र बदलण्यासाठी देशातील विविध महापुरूषांनी महामातांनी स्त्रियांना या पारंपारिक गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी एल्गार केला आणि आज या देशातली नारी विविध उच्चपदस्थ पदांवर अधिकारी म्हणून दिसत आहे. पंतप्रधान, राष्ट्रपती,



आमदार, खासदार, मंत्री, जिल्हाधिकारी, न्यायाधीश, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनीयर म्हणून दिसत आहेत. यामागे प्रेरणा केवळ या महापुरूषांचीच आहे. परंपरेने जरी स्त्रीला गुलाम बनवलं तरी स्त्री ही गुलाम नाही. ती सर्जक आहे. ती या सृष्टीची निर्माती आहे. ती या सृष्टीवर नवीन जीवन तयार करण्याच्या ताकदीची आहे. योग्य तिची आहे. निसर्गाने सुद्धा मातृत्वाची ताकद फक्त स्त्रीला दिली. त्यामुळे स्त्री ही खऱ्या अर्थाने आदिशक्ती आहे. या सृष्टीची जननी आहे असे प्रतिपादन डॉ.इंगोले यांनी व्यंकटेश गणेश मंडळ मंडीचा राजा व ऍड.किरण भालेकर मित्र मंडळातर्फे आयोजित दांडिया महोत्सवात पारितोषिक वितरण करताना प्रमुख पाहुणे म्हणून केले. यावेळी व्यासपीठावर सुप्रसिद्ध विधीज्ञ ऍड.अजित बापू लोमटे, ऍड.प्रदीप दहिवाळ, श्रीकांत धायगुडे, दांडिया महोत्सवाचे अध्यक्ष पुष्पा भालेकर, ऍड.किरण भालेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी स्त्रियांची विविध रूपे असतात. त्यामध्ये आई असते बहीण असते, पत्नी असते, प्रेयसी असते, मुलगी असते ही सर्व नाती प्रेमाची आणि ममत्वाची असतात. ज्या देशांमध्ये स्त्री ही शिक्षित असते स्त्रीला हा सन्मानाचा दर्जा दिला जातो तो देश महासत्ता बनत असतो त्यामुळे नारीला समानतेचा दर्जा दिला गेला पाहिजे नारी ही अबोला नसून ती सबल आहे तिला फक्त योग्य संधी दिली गेली पाहिजे असे वक्तव्य डॉ.इंगोले यांनी केले. यावेळी दांडिया महोत्सवात घेतलेल्या दांडिया स्पर्धेचे व खेळ पैठणीचा या स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# कोकणात वन्यप्राणी रस्त्यांवर...!

कोकणात पूर्वी सह्याद्री पट्ट्यात अनेक गुणकारी औषधी वनस्पती होत्या; परंतु रानमोडीच्या वाढीने या औषधी वनस्पती कुठे दिसेनाशा झाल्या आहेत. रानमोडी एवढ्या मोठ्या प्रमाणात जंगलात पसरत असताना आजच्या घडीला या रानमोडीची वाढ रोखण्यासाठी शासनाच्या वनविभागाकडून आजवर कोणतेही प्रयत्न देखील झाले नाही. शासनाच्या वनविभागाला जंगलातील रानमोडी रोखण्यासाठी खास उपाययोजना कराव्या लागतील तरच जंगल वाचवता येईल. शासनाकडून मिळणाऱ्या नुकसानभरपाईने खरे तर कधीच नुकसान भरून येत नाही. त्यामुळे कोकणातील शेतकरी बागायतदार खरे तर या वन्यप्राण्यांच्या रोजच्या त्रासाला फारच कंटाळला आहे; परंतु 'रोज मरे त्याला कोण रडे' याप्रमाणे कोकणातील शेतकऱ्यांच्या या व्यथेला कोणतेच उत्तर नाही... एकीकडे कोकणात कोसळलेल्या पावसाने शेतीच काय होणार असा प्रश्न घेऊन चिंताक्रांत असलेल्या शेतकऱ्याला अनेक समस्या आणि प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. निसर्गाचे चक्र विचित्र पद्धतीने सतत बदलत आहे. त्या बदलणाऱ्या ऋतुचक्राची उपाययोजना कुणाच्याच हातात नाही. या बदलाला सामोरे जाण्याचा प्रयत्न कोकणातील सर्वसामान्यजन करत आहे. या अचानक येणाऱ्या संकटाला आणि उद्भवणाऱ्या प्रसंगांना सामोरे जाण्याचा प्रयत्न होत आहे. समुद्रातील स्थितीही ठिक नाही. वादळी–वाऱ्याच्या शक्यतेने समुद्रातील मासेमारीवर कुटुंबांची उदरनिर्वाह करणाऱ्यांनाही काही सूचत नाही अशीच काहीशी विचित्र स्थिती आहे. समुद्र खवळलेला असतो. यामुळे मच्छीमारांना मासेमारीसाठी जाता येत नाही. गेल्या पंधरवड्यात तीन–चार वेळा समुद्रात वादळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. मासेमारीसाठी गेलेल्या नौका किनाऱ्यावर आणाव्या असं विचित्र ऋतुचक्र झालेलं आहे. साहजिकच त्याचा परिणाम मासेमारी व्यवसायावर झाला आहे. यामुळे कोकणातील शेतकरी असेल किंवा मच्छीमार असेल त्यांच्यापुढे समस्या आहेतच. हे सर्व असतानाच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात वन्यप्राण्यांचा लोकवस्तीतील वावर फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. कोकणात जरी फलोद्यान लागवड योजनेतून आंबा, काजू यांच्या बागायतीचे क्षेत्र वाढले असले तरीही कोकणात बेसुमार जंगलतोडीचं प्रमाणही फार मोठ्याप्रमाणात होत आहे. काही वर्षांपूर्वी



मोठ–मोठी वर्षानुवर्षांची जंगले कोकणात होती. शासकीय जमिनीतही जुनाट जंगली झाड होती; परंतु शासनाच्या वनविभागाच्या आशीर्वादानेच ही जुनी जंगल वनसंपत्ती नष्ट करण्याचे प्रमाणही वाढले आहे. बेसुमार जंगलतोड होत असताना जंगलांमध्ये सर्वत्रच रानमोडी इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या रानमोडीने जंगलातील वन्यप्राण्यांना उपयुक्त असणारी झाडांची वाढही खुंटली आहे. अलीकडे तर कोकणात जंगल शोधावी लागतील अशी आजची स्थिती आहे. याचं कारण बेसुमार जंगलतोड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे खासगी क्षेत्रातील झाडांची तोड होत असतानाच शासकीय जंगलातील झाडही तोडण्यात येतात. मोठ–मोठी सागवानसारख्या किमती झाडांची होणाऱ्या तोडमुळे कोकणातील जंगलामध्ये झाडकमी आणि रानमोडी अधिक जंगलांना रानमोडीनेच वेढा घातला आहे असे म्हटले तरी वावगे ठरू नये अशी स्थिती आहे. रानमोडी मोठ्या प्रमाणात जंगलातून पसरल्याने जंगलातील अनेक औषधी वनस्पतीही नष्ट झाल्या आहेत. कोकणात पूर्वी सह्याद्री पट्ट्यात अनेक गुणकारी औषधी वनस्पती होत्या; परंतु रानमोडीच्या वाढीने या औषधी वनस्पती कुठे दिसेनाशा झाल्या आहेत. रानमोडी एवढ्या मोठ्या प्रमाणात जंगलात पसरत असताना आजच्या घडीला या रानमोडीची वाढ रोखण्यासाठी शासनाच्या वनविभागाकडून आजवर कोणतेही प्रयत्न देखील झालेले नाही. शासनाच्या वनविभागाला जंगलातील रानमोडी रोखण्यासाठी खास उपाययोजना कराव्या लागतील तरच जंगल वाचवता येईल. नाहीतर कोकणातील सर्वच जंगलांमधील सर्वसाधारणपणे रानमोडीची वाढ झपाट्यानेच होत आहे. या जंगलातील रानमोडी वाढल्याने जंगलातील वन्यप्राणी मानवी वस्तीमध्ये येत आहे. कोकणात अनेक भागात वाघ दिवसाढवळ्या रस्त्यांवर दिसत आहे. काही गावातील घराशेजारी वाघांची डरकाळी ऐकू येऊ लागली आहे. रहदारीच्या मार्गांवर जो वाघ पूर्वी कधीतरी घनदाट जंगलात दिसायचा तो वाघ गावातून, शहरातील कॉलनीत फिरताना दिसतो. गवारेड्याचा उपद्रव तर अखंड कोकण अनुभवतोय. कोकणातील एकही जिल्हा असा नाही की ज्या जिल्ह्यामध्ये गवारेड्याने शेती–बागायती पायाखाली घातली नाही. कळपानेच गवारेडे गावात येतात आणि गावात येऊन गवारेडे शेतकऱ्यांवर हल्ले करताना दिसतात. हत्तींचा वावर कोकणातील गोवा राज्याच्या व कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागात फिरतात. ज्या भागात हत्ती फिरतात त्या भागातील शेती बागायती नष्ट झालेली असते. अनेक गावच्या शेतकऱ्यांनी वन्यप्राण्यांच्या या मानवी वस्तीतील येण्याने शेतीच सोडून दिलेली. कोकणात अनेक उदाहरणे आहेत. माकडांनी तर थेट घरातच प्रवेश घेतला आहे. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी शेती, बागायतीत जाण्यापूर्वी जर घरात जेवण बनवून ठेवलेले असेल तर माकड कळपानी घरात येतात आणि घरात बनवून ठेवलेले अन्नपदार्थ उलटे करताता. किंवा त्याचा विध्वंस करतात. माकडांच्या घरात येण्याला जसा शेतकरी कंटाळला आहे तसाच माकडांच्या नारळी, पोफळीच्या बागायतीत येऊन कोवळ्या नारळांचा विध्वंस माकड करताना दिसून येतात. वनविभागाकडे यासंबंधी शेतकऱ्यांनी तक्रार केल्यावरही वनविभागाचे अधिकारी फक्त हतबलता व्यक्त करतात. शासनाकडून मिळणाऱ्या नुकसानभरपाईने खरे तर कधीच नुकसान भरून येत नाही. त्यामुळे कोकणातील शेतकरी बागायतदार खरे तर या वन्यप्राण्यांच्या रोजच्या त्रासाला फारच कंटाळला आहे; परंतु 'रोज मरे त्याला कोण रडे' याप्रमाणे कोकणातील शेतकऱ्यांच्या या व्यथेला कोणतेच उत्तर नाही. शासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना मर्यादा आहेत. त्या पलीकडे जाऊन कोणालाच काही करता येत नाही. अशी स्थिती आहे. कोकणातील जंगलांमध्ये जंगलात रहाणाऱ्या पशु–पक्ष्यांना खाण्यासारख काही उरल नाही. केवळ यासाठीच आज पूर्वी जंगलामध्ये असणारे हे प्राणी केवळ दूरवरच्या आवाजाने त्या भागातील जंगलात आवाजावरून तो प्राणी पक्षी आहे हा अंदाज वर्तविला जायचा; परंतु गेल्याकाही वर्षातील बेसुमार जंगलतोडीने कोकणचा सृष्टी सौंदर्याने नटलेला खरा आकर्षक चेहराच विद्रुप करण्यात आला आहे. होणारी जंगलतोड वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या मूक सहमतीनेच होत असल्याने कुंपनच चोर असणाऱ्या रखवालदाराने उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न होत आहे. आज रस्त्यांवर दिसणारे हे वन्यप्राणी मानवी वस्तीतील घरापर्यंत पोहोचलेच आहे. भविष्यात कोकणातील वाडी–वस्तीत फिरणेही सामान्य शेतकऱ्यांना मुश्किल होईल याची जाणीव आणि भान राखणे आवश्यक आहे; परंतु आपल्याच मस्तीत वावरणाऱ्या आपणाला मानवी वस्तीत येऊन वन्यप्राणी शेतकऱ्यांना जाणीव करून सातत्याने देत आहेत. सुधारणा करायची की नाही हे आपणच ठरवायचे आहे. आज हमरस्त्यांवर दिसणारे हे प्राणी गल्ली–बोळातही उभे असलेले दिसतील. दोष त्या वन्यप्राण्यांचा नाही तर दोष आपला आहे. त्यांच्या वस्तीत आपणच अतिक्रमण केलय. तर ते आपल्या वस्तीत आले तर गैर काय? नाही का...?

# सामाजिक बांधिलकी म्हणून मदतीचा हा छोटासा प्रयत्न-एस.एम.देशमुख

## मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पाच गावांमध्ये ब्लँकेट चे वाटप

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आणि तलावातील पाणी सोडल्याने अनेक गावांचे मोठे नुकसान झाले. याबरोबर गोदाकाठ आणि सिंदफणा काठावरील शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झालेले आहे. अनेकांची घरे वाहून गेली. अनेकांची घरे पडली. शेतकऱ्यांची शेती निस्तनाबूत झाली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा प्रयत्न मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने करण्यात आला. माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, डेपेगाव, सांडस चिंचोली, आळसे वाडी, गंगामसला या ठिकाणी परिषदेच्या वतीने वतीने ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सर यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त देशमुख म्हणाले की पत्रकार हा समाजाचा घटक असतो आणि सामाजिक बांधिलकी म्हणून आमच्याकडून जेवढे शक्य होईल तेवढे आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. मराठवाड्यामध्ये अनेक ठिकाणी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मदत करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पावसाने आणि तलावातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. अनेकांची पिके नेस्तनाबूत झाली. अनेकांची घरे पडली.सांडस चिंचोली सारख्या गावांमध्ये तर संपूर्ण पाण्याचा वेढा पडला होता. अशा परिस्थितीत लोकांचा संपर्क तुटल्याने लोकांना वाचवणे हा मोठा प्रश्न होता. अनेकांना एनडीआरएफ च्या पथकाने बाहेर काढले. तसीच परिस्थिती देपेगाव,सांडस चिंचोलीची होती. या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात गावामध्ये पाणी घुसले



आता परिस्थिती पूर्व पदावर येत असून शेतकऱ्यांना आणि ग्रामस्थांना धान्यापासून ते वस्तू पर्यंत सर्वच गोष्टीच्या मदतीची गरज आहे. अशा परिस्थितीत मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, डेपेगाव, मंजरथ ,सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला या गावांमध्ये ब्लँकेट चे वाटप करून काही प्रमाणात का होईना पूरग्रस्तांना दिलासा दिला. यावेळी बोलताना एस.एम.देशमुख म्हणाले की मराठी पत्रकार परिषदेने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे. मराठवाडा आणि सोलापूर या भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सोलापूर आणि मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये शक्य होईल तेवढी मदत देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. याच पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील या पाच गावांना ब्लँकेट चे वाटप करण्यात येत आहे. परिषदेच्या वतीने पत्रकारांचे प्रश्न तर सोडवण्यासाठी संघर्ष केला जातोच त्याबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, डिजिटल मीडियाचे राज्याचे अध्यक्ष अनिल वाघमारे, माजलगाव तालुका अध्यक्ष हरीश यादव, पत्रकार पांडुरंग उगले, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष सुहास बोराडे, धम्मपाल डावरे या पत्रकारांसह गावातील सरपंच, चेअरमन, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कोल्हापूर येथील ट्रायथलॉन अँड डुआथलॉन २०२५' स्पर्धेत ऐरोली नवी मुंबई येथील सायकल स्वार पुरुश्रुत संजय खिलारी विजयी

**दैनिक वादळ वार्ता**
**नवी मुंबई । प्रतिनिधी**

कोल्हापूर स्पोर्ट्स क्लब तर्फे पाच ऑक्टोबर २०२५ , रविवारी 'लोहपुरूष केएससी ट्रायथलॉन अँड डुआथलॉन २०२५' ही स्पर्धा कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली होती.या ट्रायथलॉन या थलेटिक्स स्पर्धेत खेळाडूस पोहणे, सायकलिंग , धावणे हे तीन टप्पे एका पाटोपाठ पूर्ण करावे लागतात.तर डुऑथलॉन या थलेटिक्स स्पर्धेत धावणे , सायकलिंग, आणि पुन्हा धावणे हे तीन टप्पे पूर्ण करावे लागतात. या स्पर्धेत नवी मुंबईचा सायकलस्वार पुरुश्रुत संजय खिलारी याने आपल्या पहिल्याच प्रयत्नात दोन तास एकतीस मिनिटात ऑलिम्पिक डुऑथलॉन स्पर्धा पूर्ण करून प्रथम स्थान मिळविले.या स्पर्धेत सुरवातीला दहा किलोमीटर अंतर ४९ मिनिटे ५५ सेकंदात धावून पूर्ण



केले. त्यांनंतर ४० किमी अंतर १ तास ९ मिनिटात सायकलींग करुन पूर्ण केले.तर तिसऱ्या टप्प्यात ५ किमी पेक्षा अधिक अंतर २७ मिनिटे ४५ सेकंदात धावून पूर्ण केले. आणि सर्व खेळाडूं मध्ये प्रथम स्थान मिळवले.या शारीरिक क्षमता आजमावणाऱ्या एन्ड्युरन्स खेळात पुरूश्रुत खिलारी यांनी ताकद, सहनशक्ती व मानसिक बळाचा उपयोग करून स्पर्धेत विजय प्राप्त केला.

त्यांच्या या विजयाबद्दल के एस सी टीम तर्फे ट्रॉफी आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.या थलेटिक्स स्पर्धेत प्रत्येक खेळाडूने एकदा तरी सहभाग घेऊन , स्वतःच्या क्षमता आजमवण्याची संधी घ्यावी, असे सायकलस्वार पुरूश्रुत खिलारी यांनी युवकांना प्रेरणा दिली.

## मातोश्रीवर नवअन्न तोरणाची अखंड परंपरा कायम श्रद्धा, संस्कार आणि शिवसैनिकांचा उत्साहाने जल्लोष!

**अलिबाग । दैनिक वादळ वार्ता**

निसर्गाशी असलेले अटूट नाते आणि परंपरेची अखंड परंपरा जपत शिवसैनिकांच्या श्रद्धास्थान 'मातोश्री'वर यंदाही नवान्न पौर्णिमेनिमित्त नवअन्न तोरण बांधण्यात आले. कोकणातील कृषिसंस्कृती, भक्तिभाव आणि शिवसेनेच्या संघटित संस्कारांचा सुंदर संगम असलेला हा सोहळा मातोश्रीवर दरवर्षीप्रमाणेच यंदाही उत्साहात पार पडला.गेल्या अनेक वर्षांपासून रायगड जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या पुढाकाराने मातोश्रीवर हे 'नवअन्न तोरण' बांधण्याची परंपरा अखंड सुरु आहे. निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि नवीन अन्नधान्याच्या आगमनाचा आनंद साजरा करण्यासाठी हा शुभ सोहळा दरवर्षी पार पडतो.

या वेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आशीर्वादाने नवअन्न तोरण बांधण्यात आले. या प्रसंगी उद्धव ठाकरे यांनी बळीराजा सुखी होऊ दे, आपल्या मातीत पुन्हा भरभराट नांदो, आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात समृद्धीचे दिवे कायम पेटत राहू देत, अशा



भावपूर्ण शुभेच्छा दिल्या. ठाकरे यांच्या या संदेशाने उपस्थितांमध्ये उत्साह आणि भावनिक ऊर्जेची लहर पसरली.

नवान्न पौर्णिमा म्हणजे नवीन धान्याची पौर्णिमा – कोकणातील शेतकरी वर्ग या दिवशी निसर्गमातेचे आभार मानत नवीन पीक घरात आणतो. दसऱ्याच्या सुमारास सर्व धान्य घरात आल्यावर, दिवाळीपूर्वी आठ दिवस आधी साजरा होणारा हा उत्सव समृद्धीचे प्रतीक मानला जातो. घराघरात 'नवे' म्हणजे धान्याचे भारे बांधले जातात, दारात रांगोळ्या आणि दिव्यांची सजावट केली जाते, आणि धान्यलक्ष्मीचे स्वागत उत्साहात केले जाते.या सोहळ्यावेळी जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, चौल विभागप्रमुख मारुती भगत, पेण उपतालुका प्रमुख चेतन मोकल, तसेच उपकार खोत, राजू शेणवेकर, सुनील घरत, राजेश काठे, बाळू वर्तक, अल्पेश ठाकूर यांसह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.मातोश्रीवरील हा पारंपरिक सोहळा केवळ निसर्गपूजन नव्हे, तर शिवसैनिकांच्या श्रद्धा, निष्ठा आणि संस्कारांचा जीवंत आविष्कार आहे. प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही मातोश्रीच्या प्रांगणात नवअन्नाचा सुगंध, भक्तिभावाची झलक आणि शिवसेनेचा अभिमान एकवटला – मातोश्री ही फक्त वास्तू नसून, ती परंपरेचा, संस्कारांचा आणि जनभावनेचा पवित्र केंद्रबिंदू आहे, हे पुन्हा एकदा या सोहळ्याने अधोरेखित केले.


## सिना नदीचा रोष : चौथ्या सोमवारी पूर नाही,पण निलजसह अनेक गावे विळख्यात

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील जननी म्हणून ओळखली जाणारी सिना नदी पुन्हा एकदा महापुराचा त्रास देत आहे. गेले तीन सोमवार नदीने महापूराचे स्वरूप घेतले होते, आणि आज म्हणजे चौथ्या सोमवारी देखील ती समृद्ध आहे, मात्र यावेळी पूर नाही म्हणुन पण निलजसह अनेक गावकऱ्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. सिनाला मिळणाऱ्या कन्होळा नदीवर रात्रीच्या पावसाने भरपूर पाणी आल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे.

कन्होळा नदीच्या पाण्यामुळे परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. सिनेचा पुराचा परिणाम निलजबरोबरच बोरगाव, खांबेवाडी, करंजे, पोटेगाव, बालेवाडी आणि बिटरगाव या गावांमध्येही जाणवतोय. या गावांतील खालच्या भागांत पाणी शिरल्याने रहिवासी भयभीत झाले आहेत.

दुग्धव्यवसायावर मोठा फटका बसला असून, निलज आणि नाळेवस्तीतील दुग्धव्यवसायाला पाणीमुळे मोठी अडचण येत आहे. जनावरांसाठी पुरेसा चारा



उपलब्ध नसल्याने चराईचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे आणि जनावरांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. रामभाऊ गायकवाड, चेअरमन, आदिनाथ दुध संस्था, निलज यांनी सांगितले की, काही वेळा वीस लिटर दूध देणारी गायी आता फक्त दहा लिटरच दूध देत आहेत. त्यामुळे दुधाचे उत्पादन अर्ध्यावर आले असून, याचा शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा परिणाम झाला आहे.

गावातील रहिवासी पाण्याच्या आतबुरीत आजारी पडलेले असून बाहेर जाण्यासाठीचे रस्ते पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे दळणवळण मोठ्या प्रमाणात अडथळ्यांत आले आहे. शेती, दुग्धव्यवसाय आणि अन्य उत्पन्न ठप्प झाल्यामुळे ग्रामिण भागात नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. नाळेवस्ती आणि निलज येथे रस्ते नसल्याने हे भाग संपूर्ण अंदमान-निकोबार बेटासारखे अडथळ्यांनी घेरलेले आहेत. यासाठी कायमस्वरूपी रस्त्याच्या उपाययोजनांसाठी नागरिक प्रयत्नशील आहेत.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार प्रशासनाने तातडीने मदतीचा हात लावावा आणि पुरविरोधी नियंत्रणासाठी योग्य ती उपाययोजना योजावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामस्थ सिना नदीतील पाणी कमी होण्याची वाट पाहत आहेत. निलज गावातील पोलिस पाटील चित्रा राऊत, पोलीस कॉन्स्टेबल पांडे बिट नाईकनावरे, ग्रामपंचायत सदस्य अनिल भाऊ गायकवाड, बळीराम राऊत, ग्रामविस्तार अधिकारी मोकाशी, हर्षल शेंगळे, रवीभाऊ जाधव, सोमनाथ खराडे आदी जनसामान्य सिना नदीवर संगोबा येथील पुलावर तळ ठोकून स्थायी उपाययोजनांसाठी लढत आहेत.

## भा.बा.कुणबी (कृषक) समाज मंडळात गुणवंतांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला

### गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा आणि प्रेरणादात्यांच्या साक्षीने इतिहास घडवणारा आजचा हा क्षण–आमदार प्रताप अडसड



**दैनिक वादळ वार्ता**
**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

भा.बा. कुणबी (कृषक) समाज मंडळ, अमरावतीतर्फे आयोजित 'सन्मान कर्तृत्वाचा सोहळा २०२५' संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आमदार प्रताप अडसड यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. या गौरव सोहळ्यात समाजातील दहावी व बारावीतील प्रावीण्यपात्र विद्यार्थी, खेळाडू, समाजभूषण, कृषीभूषण, महिला प्रेरणा पुरस्कार विजेते, विशेष पुरस्कार विजेते, सेवानिवृत्त पोलीस बांधव तसेच सन २०२३-२४ व २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन शासकीय सेवेत रुजू झालेल्या अधिकारी-कर्मचारी बांधवांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आमदार प्रतापदादा अडसड म्हणाले,गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा आणि प्रेरणादात्यांच्या साक्षीने इतिहास घडवणारा हा क्षण आहे. समाजातील तरुणाईने शिक्षण, शेती आणि सेवाभाव या तीन क्षेत्रांत पुढे यावे, यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वाचे आहे. समाजाच्या विकासात प्रत्येकाने आपला वाटा उचलला पाहिजे.कार्यक्रमाला अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे विशेष उपस्थित होते. तसेच समाजातील विविध मान्यवर, पदाधिकारी व नागरिकांची उपस्थिती लाभली.

## पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीचा 'दादा' कोण?

# नीलेश घायवळला चंद्रकांत पाटलांची मदत-हर्षवर्धन सपकाळांचा हल्लाबोल



**दैनिक वादळ वार्ता । अमरावती (वृत्तसंस्था)–** पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच भाजप नेते व मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे. पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीला बळ देणारा 'दादा' कोण? असा सवाल करत सपकाळ यांनी पवारांवर टीका केली आहे. तर गुंड नीलेश घायवळला चंद्रकांत पाटलांची मदत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. काँग्रेसच्या अमरावती विभागाच्या आढावा बैठकीसाठी अकोला येथे आले असता हर्षवर्धन सपकाळ बोलत होते.एकनाथ शिंदे यांचे मोठेपण होऊ नये म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंदाचा शिधा योजना बंद करण्याचा निर्णय घेतल्याचा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. तसेच पुढे बोलताना ते म्हणाले, यानंतरचा टप्पा हा लाडकी बहीण योजना बंद करण्याचा राहणार आहे. हर्षवर्धन सपकाळ पुण्यातील गुन्हेगारीवर बोलताना म्हणाले, पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये ड्रग्स विकणाऱ्याला कोणी मदत केली? हे महाराष्ट्रासमोर उघड आहे. पुण्यामधील वाढती गुन्हेगारी आणि कोयता गँगच्या पाठीमागे कोणता 'दादा' आहे? हे देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर करावे. पुण्यातील गुन्हेगारीला भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी जबाबदार आहे, या आमच्या आरोपांवर शिंदे गटाच्या धंगेकरांच्या आरोपांमुळे शिक्कामोर्तब होत आहे.तसेच लाडकी बहीण योजना बंद होण्याच्या मार्गावर आहे. आनंदाचा शिधा बंद करण्याचा निर्णय त्याचाच एक भाग आहे. आनंदाचा शिधा बंद करण्यामागे एकनाथ शिंदेंचे नाव होऊ नये, म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी ही योजना बंद केल्याचा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

# माजलगाव नगरपरिषद सदस्यपदांची आरक्षण सोडत जाहीर; अनेक इच्छुकांना संधी; दिग्गजांना फटका

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

माजलगाव नगरपरिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी २६ सदस्यपदांच्या आरक्षणाची सोडत आज तहसील कार्यालयात पार पडली. प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार संतोष रूईकर यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत नगरपरिषदेच्या सभागृहात पार पडली. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पोपट निगळ यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी व विविध पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

या सोडतीमुळे माजलगाव नगरपरिषदेतील प्रभागनिहाय आरक्षणाचे चित्र स्पष्ट झाले आहे. अनेक नव्या इच्छुकांना राजकारणात प्रवेशाची संधी मिळाली असून, काही अनुभवी दिग्गजांना आरक्षित जागेमुळे मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. नगरपरिषदेच्या हद्दीत सध्या ४९ हजार ४५३ लोकसंख्या असून, एकूण १३ प्रभागांमधून २६ नगरसेवक निवडले जाणार आहेत. यामध्ये अनुसूचित जातीसाठी ३ जागा (त्यापैकी २ महिला), नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) यासाठी ७ जागा (त्यापैकी ४ महिला) राखीव ठेवण्यात आल्या आहेत. एकूण १३ जागा महिलांसाठी राखीव असल्याने यंदाच्या निवडणुकीत महिला उमेदवारांचे वर्चस्व ठरण्याची शक्यता आहे.



**प्रभागनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आले**

प्रभाग क्र. १ : (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला, (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र. २ : (अ) अनुसूचित जाती महिला, (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र. ३ : (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग, (ब) सर्वसाधारण महिला,प्रभाग क्र. ४ : (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग, (ब) सर्वसाधारण महिला,प्रभाग क्र. ५ : (अ) सर्वसाधारण महिला, (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र. ६ : (अ) सर्वसाधारण महिला, (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र. ७ : (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला, (ब) सर्वसाधारण ,प्रभाग क्र. ८ : (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला, (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र. ९ : (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग, (ब) सर्वसाधारण महिला,प्रभाग क्र. १० : (अ) सर्वसाधारण महिला, (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र. ११ : (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला, (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र. १२ : (अ) अनुसूचित जाती महिला, (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र. १३ : (अ) अनुसूचित जाती, (ब) सर्वसाधारण महिला

**नगराध्यक्षपद ओबीसी महिलांसाठी राखीव**

यंदाच्या निवडणुकीत नगराध्यक्षपद इतर मागासवर्गीय (ओबीसी) महिलेसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. त्यामुळे नगराध्यक्षपदासाठी चुरस अधिक वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांच्या शोधाला सुरुवात केली असून, स्थानिक पातळीवर पक्षांतर्गत चर्चा, गाठीभेटी आणि तणाव वाढल्याचे चित्र आहे.

**राजकीय समीकरणांमध्ये उलथापालथ**

सोडतीनंतर अनेक इच्छुक उमेदवारांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत असताना, काही प्रभाग आरक्षित झाल्याने काही दिग्गजांचे समीकरण कोलमडले आहे. त्यामुळे शहरातील राजकारणात नव्या चेहऱ्यांना संधी मिळेल, तर जुने नेते आपला वारसदार पुढे आणण्याचा प्रयत्न करतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.आता आरक्षण निश्चित झाल्याने सर्वच पक्षांनी अंतिम मोर्चेबांधणी सुरू केली आहे. काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना तसेच स्थानिक गटांनी रणनीती आखायला प्रारंभ केला आहे. दिवाळीनंतर निवडणुकीची सरगर्मी आणखी वाढणार असून, माजलगाव नगरपरिषदेची लढत चुरशीची होण्याचे संकेत मिळत आहेत.

# भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई साहेबांवरील हल्ल्याचा अक्कलकुवा वकील संघाचा तीव्र निषेध

**दैनिक वादळ वार्ता**
**बोरद । मंगेश पाटील**

भारताचे सन्माननीय सरन्यायाधीश आदरणीय श्री. भूषण गवई साहेब यांच्यावर दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या हल्ल्याचा अक्कलकुवा वकील संघाने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. आरोपी ॲड. राकेश किशोर यादव याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघाच्या ठरावाद्वारे करण्यात आली आहे.



दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी अक्कलकुवा वकील संघाची सर्वसाधारण बैठक संघाचे अध्यक्ष ॲड. संग्राम पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीत सर्व सदस्य उपस्थित होते. बैठकीत सर्वोच्च न्यायालयातील घटनेचा तीव्र निषेध करत, सर्वोच्च न्यायालय हे भारतीय लोकशाहीचे आणि न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च प्रतीक असल्याचे नमूद करण्यात आले. अशा पवित्र स्थळी हल्ला होणे म्हणजे न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणारे व देशाच्या संविधानिक मूल्यांवर आघात करणारे कृत्य असल्याचे सर्व सदस्यांचे मत नोंदविण्यात आले.महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलने या घटनेचा निषेध नोंदवून आरोपी ॲड. राकेश किशोर यादव याच्यावर कठोर कारवाई करण्याचा ठराव मंजूर केला आहे. त्या ठरावाला अक्कलकुवा वकील संघाने एकमुखाने पाठिंबा दर्शवला आहे.बैठकीत उपस्थित सर्व सदस्यांनी न्यायव्यवस्थेचा सन्मान अबाधित राखण्याचा आणि भविष्यात अशा घटनांविरुद्ध एकजुटीने उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.या बैठकीस सचिव ॲड. रुपसिंग वसावे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.एम. व्ही. कलाल,ॲड. आर. आर. मराठे,ॲड.एस. व्ही. वाणी,ॲड. आर. टी. वसावे, ॲड. जे. टी. तडवी,ॲड. एच. एन. पाडवी, ॲड. जितेंद्र वसावे, ॲड.आर. पी. तडवी,ॲड. जे. के. राऊत,तसेच इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांसाठी आरोग्यदायी उपक्रम! ’सिकल सेल’ व आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात पार

## भुजगाव आणि हरणखुरी शाळेतील उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक वादळ वार्ता**
**मोलगी । रविंद्र वळवी**



मुख्यमंत्री ग्रामसमृद्धी अभियान आणि आदर्श ग्राम अभियान अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत भुजगाव आणि प्राथमिक आरोग्य केंद्र खुंटामोडी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा भुजगाव आणि हरणखुरी येथे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व सिकल सेल तपासणी शिबीर नुकतेच उत्साहात पार पडले. गावपातळीवर आरोग्य सेवा पोहोचवण्याचा हा प्रयत्न यशस्वी ठरला असून, शिबिराला विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या महत्त्वाकांक्षी उपक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांसह गरोदर माता आणि अंगणवाडीतील बालकांनी सहभाग घेतला. एकूण ९० हून अधिक लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली, ज्यात ७० विद्यार्थी, १० गरोदर माता आणि १० अंगणवाडीतील बालकांचा समावेश होता.

शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांची खालीलप्रमाणे तपासणी करण्यात आली: ज्यामध्ये उंची, वजन, रक्तदाब, दृष्टी, त्वचा आणि दात तपासणी., सिकल सेल तपासणी (रक्त नमुन्यांद्वारे चाचणी) आणि हिमोग्लोबिन तपासणी.,पौष्टिक आहाराविषयी मार्गदर्शन, मुलांना स्वच्छतेचे धडे तसेच गरोदर मातांसाठी पोषण आणि गर्भवती काळातील काळजी यावर माहिती देण्यात आली.

डॉ. निलेश वळवी यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे नियोजन करण्यात आले. निलेश परमार (कम्युनिटी हेल्थ ऑफिसर) यांनी समन्वयक म्हणून महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. सी. पी. तोरडे, डी. व्ही. परमार, राकेश पावरा आणि अविनाश पाडवी यांच्या आरोग्य पथकाने कोणतीही गडबड न होता, सर्व प्रक्रिया शिस्तबद्ध पार पाडली.

# जागेची किंमत कमी करून देतो–केज सह दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा नवा खेळ सुरु

## दस्त नोंदणीसाठी घेतले जातात हजारो रुपये; नागरिकांचा संताप

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील सह–दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दस्त नोंदणीसाठी गोरगरीब जनतेकडून हजारो रुपयांची लाच मागवली जाते, अशी गंभीर तक्रार नागरिकांनी केली असून, या लुबाडणाऱ्या दलाल व संबंधित कर्मचाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणी पक्षकारांकडून होत आहे.




शासनाच्या नियमानुसार, शेतजमीन, घर किंवा जागा खरेदी–विक्रीसाठी सरकारने निश्चित केलेल्या मुल्यांकनावर आधारित फी भरून दस्त नोंदणीची प्रक्रिया केली जाते. मात्र, प्रत्यक्षात शासनाचे शुल्क भरूनही दस्त नोंदणीसाठी अतिरिक्त रकमेची मागणी दलालांच्या माध्यमातून केली जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अलीकडेच दलालांनी नवीन फसवणुकीची पद्धत सुरू केली आहे. जागेची किंमत कमी करून देतो, तुमची जागा बागायती सर्वे नं मध्ये दाखवत आहे किंमत जास्त होईल त्यामुळे तुम्हाला जास्त चलन भरावे लागेल, पण आम्ही ते कमी करून देतो; मात्र त्यासाठी वरून वेगळी रक्कम द्यावी लागेल, आणि ऑपरेटर चे वेगळे पैसे द्यावे लागलेत अशी बनावट आश्वासने देऊन नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे उघड झाले आहे. अशा पद्धतीने दस्त नोंदणी प्रक्रियेत भ्रष्टाचाराचे जाळे अधिक घट्ट झाले आहे. काही दलाल आणि संबंधित कर्मचारी दस्त नोंदणीपूर्वीच व्यवहार ठरवतात आणि व्यवहार पूर्ण झाल्यावर कमिशनच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात पैसे घेतात. ही अवैध पद्धत उघडपणे सुरु असून, गोरगरीब जनतेचे आर्थिक शोषण होत आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाऊंगा, ना खाने दूंगा अशी घोषणा केली असली तरी या कार्यालयातील दलाल व काही कर्मचारी या घोषणेची थट्टा करत असल्याचे नागरिक सांगत आहेत. आमचं कोणी काही करू शकत नाही या भावनेत हे लोक वावरत असून, भ्रष्टाचाराचा उघड उघड बाजार सुरू आहे.

नागरिकांनी शासनाकडे मागणी केली आहे की, या दलाल आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी करून आर्थिक व्यवहारांची तपासणी करण्यात यावी. तसेच, सह–दुय्यम निबंधक कार्यालयातील भ्रष्टाचारावर अंकुश घालून सर्वसामान्यांना न्याय मिळावा, अशी तीव्र मागणी जनतेकडून होत आहे.

# तुलसी कॉलेजमध्ये दहा दिवसांची फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी कार्यशाळा




**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे सोमवारपासून दहा दिवसांची फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी कार्यशाळा सुरू झाली असून दिनांक ६ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत विद्यार्थ्यांना छायाचित्रण आणि व्हिडीओ शूटिंगच्या आधुनिक तंत्राचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे.या कार्यशाळेचे उद्घाटन देवगिरी प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ.सुनील जोंधळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे उपस्थित होत्या तर मार्गदर्शक म्हणून व्यावसायिक छायाचित्रकार प्रितम हाटकर आणि त्यांचे सहकारी संजय जोंधळे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत आहेत.

या वेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. सुनील जोंधळे म्हणाले की,आजच्या काळात फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी हे फक्त छंद न राहता एक व्यावसायिक क्षेत्र बनले आहे. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेद्वारे तांत्रिक कौशल्य आत्मसात करून स्वतःसाठी करिअरच्या नव्या दिशा निर्माण कराव्यात. तर प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत सांगितले की,सध्याच्या डिजिटल युगात फोटोग्राफी व व्हिडीओग्राफीच्या क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना लाईटिंग, कॅमेरा वापरणे, सीन सजवणे, व्हिडीओ शूट करणे आणि एडिटिंग याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार असून, महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग दाखवला आहे.तसेच मोठ्या संख्येने नोंदणी झाल्यामुळे कार्यशाळेला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# रोकडेश्वरी आई देवी मंदिरचा जिर्णोद्धार व कलशरोहन आनंदात करण्यात आला–पांडुरंग आवारे–पाटील

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

दि.०७/ ऑक्टोबर २०२५ रोजी रोकडेश्वरी आई देवी जाग्रत देवस्थान मंदिराचा जीर्णोध्दार व कलशरोहन कार्यक्रम श्री.नरेश महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो भाविक भक्ताच्या उपस्थितीत संपन्न झाला या प्रसंगी ह भ प श्री संजय महाराज पाचपोर यांचे किर्तन सकाळी १० ते १२.३० वाजेपर्यंत झाले त्यानंतर मानेवाडी.ता.जि.बीड, पिंपळगाव घाट,वाढवणा, रूईगव्हान, माळेवाडी व पंचक्रोशीतील आलेल्या सर्व भाविक भक्तांसाठी देवस्थान च्या वतीने मोफत आरोग्य शिबीर ठेवण्यात आले होते व यावेळेस १७२ रक्त दात्यांनी रक्तदान केले व पंचक्रोशीतील आलेल्या हजारो भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे–भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस प्रमुख उपस्थिती लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथील महंत श्री योगी सोमवार नाथजी,श्रीयोगी स्मशेर नाथजी,श्रीयोगी सिद्धेश्वर नाथजी,श्रीयोगी बद्रीनाथजी व बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सौ.सरलाताई कामराज मुळे, पोलीस निरीक्षक श्री अजिनाथ काशिद साहेब,डॉ सारीका योगेश क्षीरसागर, चौसाळ येथील वैद्यकीय अधिकारी डॉ वैभव मोटे साहेब मा जि प सदस्य विलास महाराज शिंदे, अशोक लोढा,बबनराव गवते,अँड गणेश मोरे,शैलेश सुरवसे,नितीन धांडे,मा सभापती काकासाहेब जोगदंड,बाळासाहेब राऊत, युवा नेते दिनेश साठे,धाराशिव मा जि प सदस्य महादेवराव आखाडे व अन्य सामाजिक राजकीय विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवर भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.रोकडेश्वरी आई देवी मंदिर देवस्थान येथे आलेल्या प्रमुख मान्यवरांचे देवस्थान च्या वतीने स्वागत करण्यात आले.व देवस्थान येथे आलेल्या सर्व भाविक भक्ताचे पांडुरंग आवारे–पाटील यांनी आभार मानले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077